## कृषी सल्ला (राहुरी विभाग)

### हवामान अंदाज

प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार, पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. ता. ४ व ५ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. इतर दिवस हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. ता. ३ ते ५ सप्टेंबर या काळात घाट भागात विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यासह मध्यम ते जोरात पाऊस पडण्याचा इशारा देण्यात येत आहे.

### मूग

**काढणीची अवस्था**

- बहुतांश ठिकाणी मूग पीक हे काढणीच्या अवस्थेत आहे. मुगाच्या शेंगा ७५ टक्के वाळल्यावर पहिली तोडणी करायची असते. त्यानंतर ८ ते १० दिवसांनी राहिलेल्या सर्व शेंगा तोडाव्यात. या तोडणी पावसाची उघडीप मिळताच करून घ्याव्यात.
- पावसाची शक्यता असल्याने, काढणी केलेले धान्य सुरक्षित ठिकाणी किंवा प्लॅस्टिकने झाकून ठेवावे.
- शेंगा खळ्यावर सूर्यप्रकाशात चांगल्या वाळवल्यानंतर झोडणी करता येईल. (काठीच्या साहाय्याने झोडपून दाणे अलग करून घ्यावेत.) साठवण कोंदट किंवा ओलसर जागेत करू नये. शक्य झाल्यास धान्यास १ टक्का करंज किंवा एरंडीचे तेल चोळावे किंवा कडुनिंबाचा पाला (५ टक्के) धान्यात मिसळून धान्य साठवावे. यामुळे धान्य साठवणुकीतील किडींपासून संरक्षण होते.



तूर पिकामध्ये वांझ रोगाचा प्रादुर्भाव असलेली झाडे उपटून नष्ट करावीत.

### तूर

- फांद्या फुटण्याची अवस्था
- तूर पिकामध्ये वांझ रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास रोगग्रस्त झाडे उपटून नष्ट करावी.

### कापूस

- फुले उमलणे ते बोंड धरणे
- सध्याचे पावसाळी व आर्द्रतापूर्ण पोषक वातावरणामध्ये पिकाची वाढ जोमात होते. त्यातच जमीन भारी असल्यास आणि विशेषतः रासायनिक खते मिळाल्यास बागायती क्षेत्रातील संकरित वाणाची कायिक वाढ जास्त होते. ती आटोक्यात ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज असते. अन्यथा बोंडाच्या वजनामुळे फांद्या मोडण्याची शक्यता असते. त्यामुळे ८० दिवसाचे पीक झाल्यावर मुख्य फांदीचा शेंडा खुडून पिकाची कायिक वाढ मर्यादित ठेवावी.



तीळ पिकावरील पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव.

### फळझाडे

लीफ मायनर, सायला आणि फुलकिड्यांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी इमिडाक्लोप्रिड (१७.८ एसएल) ०.३ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. माइट्सच्या नियंत्रणासाठी स्पायरोमेसिफेन (२२.९ एस.सी.) ०.८ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.



मका पिकावरील लष्करी अळीचा प्रादुर्भाव

### मका

- वाढीची अवस्था
- लष्करी अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास,
- अळीच्या वाढीच्या सुरुवातीच्या (१ ते ३ अवस्था) अवस्थांमध्ये निंबोळी अर्क ५% किंवा अॅझाडिरॅक्टीन (१५०० पीपीएम) ५ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा
- क्लोरअॅन्ट्रानिलीप्रोल (१८.५% एस. सी.) ४० ग्रॅम प्रती हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट (५% एसजी) ८ ग्रॅम प्रती लिटर या प्रमाणात फवारणी करावी. अथवा
- स्पिनेटोरम (११.७ एस. सी.) ०.५ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. अथवा
- इमामेक्टीन बेन्झोएट (५%) अधिक ल्युफेनुरॉन (४०% डब्लू.जी.) (संयुक्त कीटकनाशक) ०.२ ग्रॅम किंवा नोव्हाल्युरॉन (५.२५%) अधिक इमामेक्टीन बेंझोएट (०.९% एस. सी.) (संयुक्त कीटकनाशक) ३ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.

### तीळ

तिळामध्ये पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव अनेक ठिकाणी दिसून येत आहे. हा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या वर असल्यास निंबोळी अर्क (५ %) किंवा अॅझाडिरेक्टीन (१५०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड (५० एसपी) २ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

### भाजीपाला

- फुलकिड्यांच्या (थ्रिप्स) नियंत्रणासाठी कडुनिंबाची भुकटी ५०० ग्रॅम (५% अर्क) किंवा कडुलिंबाचे तेल ५० मि.लि.किंवा कडुनिंब आधारित फॉर्म्युलेशन (५ ईसी असल्यास १ मि.लि. आणि ०.०३ ईसी असल्यास ५ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. (अॅग्रेस्को शिफारस)
- फुलकिड्यांच्या प्रादुर्भावाची तीव्रता अधिक असल्यास, प्रोफेनोफॉस (५० ईसी) २ मि.लि. किंवा स्पिनोसॅड (४५ एससी) ०.३ मि.लि. किंवा स्पिनेटोरम (११.७ एससी) ०.९ मि.लि. किंवा सायअॅन्ट्रानिलीप्रोल (३ ओडी) २ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.
- **कोळी (माइट्स)** – कोळी किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास, इथिऑन (५० ईसी) १.५ मि.लि. किंवा प्रोपारगाईट (५७ ईसी) ३ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.
- **पांढरी माशी :** ही रसशोषक किडी असून, तिच्या प्रत्यक्ष नुकसानीसोबतच विषाणूजन्य रोगांचा प्रसारामुळे मोठे नुकसान होते. ते टाळण्यासाठी पांढऱ्या माशीच्या जैविक नियंत्रणाकरीता पिकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पिके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हर्टीसिलीअम इ.) या एकात्मिक पद्धतींचा अवलंब करावा.
- रासायनिक नियंत्रणासाठी, सायअॅन्ट्रानिलिप्रोल (१०.२६ ओडी) १.८ मि.लि. किंवा इमिडाक्लोप्रिड (१७.८ एसएल) ०.३ मि.लि. किंवा फेनप्रोपॅथ्रिन (३० ईसी) ०.५ मि.लि. किंवा पायरीप्रॉक्झिफेन (१० ईसी) १.७ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.
- भाजीपाला पिकांमध्ये लागवडीनंतर रसशोषक किडीच्या

### कांदा

- लागवड
- रांगडा कांदा लागवडीसाठी बसवंत ७८०, फुले समर्थ, एन-२-४-१ इ. सुधारीत वाणांची निवड करावी.
- लागवडीची वेळ : सप्टेंबर - ऑक्टोबर.
- बियाण्याचे प्रमाण: ८ ते १० किलो/ हेक्टर

### ऊस

मावा आणि पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्क किंवा अॅझाडिरेक्टीन (१५०० पीपीएम) ५ मिलि प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करावी.

### चवळी

मावा किडीच्या नियंत्रणासाठी थायामेथोक्झाम (२५ डब्ल्यूजी) ०.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.



सोयाबीन पिकामध्ये कीड नियंत्रणासाठी स्पोडोल्युअर असलेले कामगंध सापळे लावावेत.

### सोयाबीन

- फुलोऱ्याची अवस्था
- या काळात स्पोडोप्टेरा लिट्यूरा अळीचा प्रादुर्भाव वाढतो. हे लक्षात घेऊन त्यांच्या सर्वेक्षणासाठी कामगंध सापळे हेक्टरी पाच वापरावते. त्यात स्पोडोल्यूअरचा वापर करावा.



वांगी पिकावरील पांढरी माशी प्रादुर्भाव

### वांगी

- शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीवर असल्यास क्लोरअॅन्ट्रानिलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मि.लि. प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.
- पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्क किंवा कडुलिंबाचे तेल ५ मि.लि. अधिक डायफेंथ्युरॉन (५० डब्ल्यूपी) १.६ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. (अॅग्रेस्को शिफारस)

### केळी

रस शोषक किडींच्या नियंत्रणासाठी निंबोळी तेल ४ मि.लि. (अॅग्रेस्को शिफारस) किंवा अॅसीफेट (७५ एसपी) १.५ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.


०२४२६- २४३२३९

प्रमुख, कृषी विद्या विभाग आणि ग्रामीण कृषी मौसम सेवा, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी